|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**Kavayitri Bahinabai Chaudhari**
**North Maharashtra University, Jalgaon**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**



उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६

Umavinagar, Jalgaon Tel Nos. : ०२५७-२२५७२७६ to २२५७२७७, Fax Nos.:०२५७-२२५८४०३, ४०६
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/ ३८५ /२०२६    महत्वाचे / कालमर्यादित    दि. १३/०४/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित
कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य
महाविद्यालय, जळगाव, धुळे व नंदूरबार

विषय : दि. ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फिल. अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणेसंदर्भात.

संदर्भत: शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे पत्र
जा.क्र. उशिस/संकीर्ण/२०२५/विशि-/ई-७४८२५८ दि. ०५.०३.२०२६

महोदय,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, एम. फिल. पदवी धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यासंदर्भात विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांचेकडून करण्यात आली होती. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगास शासनपत्र दि. १५ जुलै, २०२४ अन्वये सादर करण्यात आला होता. त्यानुसार प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने तज्ज्ञ समितीचे गठण केलेले होते. सदर समितीकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात आली. समितीच्या शिफरसीनुसार दि. ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फिल. पदवी पूर्ण केलेल्या आणि १४ जून २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्त झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेल्या १४२१ अध्यापकांना युजीसीने त्यांचे पत्र दि. २.७.२०२५ व शासनपत्र दि. १८.७.२०२५ अन्वये दि. ११ जुलै २००९ पूर्वी एम. फिल. अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीखा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली आहे व त्यानुसार कार्यवाही करणे बाबत संचालनालयाचे पत्र दि. २२.७.२०२५ अन्वये सर्व विभागीय संचालकांना कळविण्यात आले आहे.

तथापि, उपरोक्त संदर्भीय पत्रात सूचित केल्याप्रमाणे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव शी संलग्नित महाविद्यलयातील दि. ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फिल. अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणेसंदर्भात प्रस्ताव युजीसीकडून विचारार्थ घेण्यात आले नसतील किंवा युजीसीकडे सादर करावयाचे राहील असतील असे प्रस्ताव संचालनायालकडे सादर करण्यात येऊ नयेत. सदरहू प्रस्ताव विद्यापीठामार्फत युजीसीकडे परस्पर सादर करुन याबाबत विद्यापीठास कळविलेले आहे. (सोबत संदर्भीय पत्र जोडलेले आहे.)

त्याअनुषंगाने संदर्भीय पत्रात नमुद केल्याप्रमाणे महाविद्यालयांकडून खालील प्रमाणे कार्यवाही अपेक्षीत आहे.

१. दि. ११ जुलै, २००९ पूर्वी एम.फिल. पदवी पूर्ण केलेल्या आणि १४ जून २००६ पूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेले शिक्षक ज्यांचे प्रस्ताव युजीसी कडून विचारार्थ घेण्यात आले नसतील किंवा युजीसीकडे सादर करावयाचे राहले असतील अशाच प्रस्तावांना विद्यापीठाकडे पाठवावे.

२. महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अशा प्रस्तावांची आपल्या स्तरावरुन छाननी व खात्री करावी आणि पात्र शिक्षकांचेच प्रस्ताव विद्यापीठाकडे अग्रेषित करावे.

.. २

३. प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहीत अनुक्रमणिकेत नमुद सर्व सांक्षांकित कागदपत्रांसह तीन प्रतींत विशेष दुतामार्फत सोमवार दि. २७ एप्रिल, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत व्याख्याता मान्यता विभागाकडे स्वहस्ते / प्रतीनिधींकडून पाठवावेत, ही विनंती.

आपला विश्वासू

उपकुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

सोबत : १. शासनाच्या संदर्भीय पत्राची पत्र  २. प्रस्तावासाठी अणुक्रमणिका,

प्रत माहितीसाठी:

१. मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

# प्रस्तावाची अनुक्रमणिका - **Index**

| क्र. | मुद्दा | पृष्टीसाठी प्रमाणपत्र | पृष्ठ क्र |
|---|---|---|---|
| ०१ | प्राचार्यांचे पत्र Forwarding Letter | महाविद्यालयाच्या लेटरपॅडवरील पत्र | |
| ०२ | पदव्यूत्तर पदवी उत्तीर्ण वर्ष व मिळालेल्या गुणांची टक्केवारी Year ot passlng Master's Degree with percentage ol marks Date of acquirlng M.Phll | पदव्यूत्तर पदवीचे गुणपत्र व प्रमाणपत्र Marksheet & Degree of Master Degree | |
| ०३ | एम. फिल. पदवी प्राप्त झाल्याची तारीख Date of acquirlng M.Phll Degree | एम. फिल पदवीचे गुणपत्रक Marksheet of M.Phil Degree | |
| | | एम. फिल पदवीचे प्रमाणपत्र Degree Certificate of M.Phil Degree | |
| | | एम. फिल पदवीचे वैधता प्रमाणपत्र Validity of M.Phil Degree | |
| | | एम. फिल. नोटीफिकेशन Notification of M.Phil. Degree | |
| ०४ | नियमितपणे गठीत निवड समितीमार्फत निवड झाली आहे काय ? Seteclion through duly constituted setectlon commlttee (Yes/No) | निवड समिती अहवाल Selection Committee Report | |
| ०५ | नियुक्ती दिनांक - Date of Appointment | नियुक्तीचे आदेश (परीविक्षा कालावधीचे) Appointment Letter - Probotion | |
| | | नियुक्तीचे आदेश (कायम झालेल्या कालावधीचे) Appointment Letter- Confirm | |
| | | महाविद्यालयात रुजू झाल्याचा अहवाल Joining Letter | |
| ०६ | कायम झाल्याचा दिनांक Date of Confirmation | सेवेत कायम झाल्याचे पत्र -Confirmation Letter | |
| ०७ | विद्यापीठ मान्यता Approval Letter | विद्यापीठ व्याख्याता मान्यता पत्र | |
| ०८ | रिक्त जागा - पदमान्यता | | |
| ०९ | मंजूर रोस्टर | | |
| १० | मान्य पदाची प्रकाशित जाहिरात | वृत्तपत्रीय कात्रण - वर्तमानपत्राचे नाव व दिनांक | |
| ११ | मा. सहसंचालक कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र | NOC | |
| १२ | आवेदन पत्र Application Letter | | |
| १३ | मुलाखतीस बोलाविलेल्या उमेदवाराची यादी व उपस्थित उमेदवारांची यादी | | |
| १४ | सेवा पुस्तिका | | |
| १५ | सेवाखंड असल्यास क्षमापित पत्र | | |
| १६ | इतर महाविद्यालयात सेवा केली असल्यास मूळ महाविद्यालयाने धारणाधिकार मंजूरीकेल्याबाबतचे पत्र | | |
| १७ | न्यायालयात दाखल याचिका, निकाल लागलेल्या याचिका, प्रलंबित याचिकांची माहिती | | |
| १८ | जातीचा दाखला व जात पडताळणीचा दाखला | | |
| १९ | शैक्षणिक कागदपत्रे - | पदवी, पदव्युत्तर, नेट, सेट, पीएच डी, गुणपत्रक व पदवीप्रमाणपत्र. | |
| २० | विद्यापीठ समितीने दिलेल्या शिफारशीनुसार यापूर्वी एम.फिल. ला सुट दिली आहे काय? | एम. फिल. सूट संदर्भातील पत्र (असल्यास) | |

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे ४११ ०१६.
Web : www.dhepune.gov.in E-Mail : vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक.उशिस/संकीर्ण/एमफील/२०२५/ विशि/ई- ७४८२५८ दि.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय :- ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फील अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणेबाबत.

संदर्भ: १. शासन पत्र क्र.संकीर्ण-२२०४/प्र.क्र.११/विशि-१ दिनांक २२.०८. २०२४.
२. संचालनालयाचे पत्र क्र.संकीर्ण२०२४/संकीर्ण/औवि/विशि दि.२७.०८.२०२४
३. शासन पत्र क्र.संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दिनांक २६.०९.२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, एम. फिल पदवी धारण करणाऱ्या अध्यापकांना एन.ई.टी. (NET) परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट द्यावी, अशी मागणी विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली होती. त्यानुसार एम. फिल पदवी धारण केलेल्या अध्यापकांना एन.ई.टी. (NET) परीक्षेमधून सूट देण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास शासनपत्र दिनांक 15 जुलै, 2024 अन्वये सादर करण्यात आला होता. त्यानुसार अशा प्रकरणांची तपासणी करण्यासाठी आयोगाकडून तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात आली आहे. समितीच्या शिफारशीनुसार, दि.११.०७.२००९ पूर्वी एम. फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि १४ जून २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या, नियमित/कायमस्वरूपी सेवेत असलेल्या, १४२१ अध्यापकांना युजीसीने त्यांचे पत्र दि.०२.०७.२०२५ व शासनपत्र दि.१८.०७.२०२५ अन्वये दिनांक ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फील अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली आहे व त्यानुसार कार्यवाही करणेबाबत संचालनालयाचे पत्र दि.२२.०७.२०२५ अन्वये सर्व विभागीय सहसंचालक यांना कळविणेत आले आहे.

तथापि, आपल्या विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांचे प्रस्ताव युजीसीकडून विचारार्थ घेण्यात आले नसतील किंवा युजीसीकडे सादर करावयाचे राहीले असतील असे प्रस्ताव संचालनालयाकडे सादर करण्यात येऊ नयेत. सदरहु प्रस्ताव आपल्या विद्यापीठामार्फत युजीसीकडे परस्पर सादर करुन याबाबत पुढील निर्देश प्राप्त करुन घ्यावेत.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 05-03-2026 18:10:15

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.